**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**गुरुवार दिनांक १४ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **मृद व जलसंधारण विभागाच्या सुमारे ८ हजार ७६७ पदांना राज्य मंत्रिमंडळाची मान्यता.**
2. **राज्यात मतदार यादीच्या SIR अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरू होणार.**
3. **केंद्र सरकारकडून साखरेच्या निर्यातीवर तात्काळ प्रभावाने बंदी.**
4. **राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना ३० जूनपर्यंत उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक – एचएसआरपी बसवणं अनिवार्य.**

---

मंत्रिमंडळ निर्णय

मृद आणि जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करायला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, राज्यातल्या ८ हजार ७६७ पदांना मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. मृद आणि जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचनाही होणार आहे. वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी विकास शुल्कामधे ५० टक्के सवलत देण्याला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्याचप्रमाणे वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परिक्षेस बसण्याच्या संधीची सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता राखीव प्रवर्गातच होणार आहे. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे. तसंच विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना, १२ आणि २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर, चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवडश्रेणी लागू करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. संत्री आयात शुल्क परतावा योजना रद्द करणे, पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्याच्या सुधारित धोरणाला मंजुरी, महाराष्ट्र राज्य अनुसूचित

जमाती आयोग अधिनियम, २०२५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता,आदी निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाले.

--------------------------------------

विशेष सखोल पुनरीक्षण

राज्यात मतदार यादीच्या SIR अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरू होणार आहे.कैंद्रीय निवडणूक आयोगानं आज १६ राज्य आणि ३ केंद्र शासित प्रदेशातल्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं. त्यानुसार राज्यात ३० जून ते २९ जुलै दरम्यान बीएलओ अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेटी देऊन मतदारांची पडताळणी करतील. त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होईल. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान हरकती दाखल करता येतील. या हरकतींवर ३ ऑक्टोबरपर्यंत सुनावणी होऊन निकाल दिले जातील आणि ७ ऑक्टोबरला राज्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. १ ऑक्टोबरपर्यंत वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या नागरिकांची नावं या मतदारयादीत समाविष्ट होतील. राज्यात सध्या ९ कोटी ८६ लाख ६४ हजार ४१३ मतदारांची नोंद आहे.

--------------------------------------

विधानपरिषद

महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आलेल्या १० नवनिर्वाचित सदस्यांचा आज शपथविधी झाला. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.यात शिवसेनेच्या डॉ.नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, तसंच भाजपाच्या डॉ. प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, माधवीनाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे आणि नागपूरचे संजय भेंडे यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अंबादास दानवे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे झिशान सिद्दीकी यांनीही विधानपरिषद सदस्यत्वाची शपथ घेतली.

--------------------------------------

साखरेच्या निर्यातीवर बंदी

केंद्र सरकारनं साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली असून यामध्ये कच्च्या, पांढऱ्या आणि शुद्ध साखरेचा समावेश आहे, ही बंदी तात्काळ प्रभावानं सप्टेंबर२०२६ पर्यंत किंवा पुढील सूचना येईपर्यंत लागू असेल. साखरेचा देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करणं आणि स्थानिक किमतींवर नियंत्रण ठेवणं हा यामागचा उद्देश आहे. मात्र युरोपियन युनिअन आणि अमेरिकेसाठी काही विशिष्ट कोट्याकरता अपवाद असून,

केवळ त्यासाठी साखरेची निर्यात केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे सध्या प्रत्यक्ष निर्यात प्रक्रियेत असलेल्या मालाला देखील यातून सूट देण्यात आली आहे.

---------------------------------------

खाद्य तेल

आयात केलेल्या खाद्य तेलाचा वापर कमी करण्यासाठी राज्य सरकारकडून पामतेल तसंच सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा आणि मोहरीच्या तेलाच्या वापराला शासकीय उपहारगृह, अंगणवाडी, रुग्णालयं आणि वसतिगृहांमध्ये प्राधान्य दिलं जाणार आहे. यासाठी मेन्यूतही बदल केला जाणार आहे. काटकसर आणि इंधन बचतीसाठी सरकारनं काल प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात हे आदेश नमूद आहेत. कोणत्याही कारणांसाठी बाइक रॅली, वाहनांच्या मिरवणुकांना पोलिसांनी परवानगी देऊ नये, असे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये रेस्टॉरंट आणि हॉटेलांमध्ये पीएनजीचा वापर बंधनकारक केला आहे. तसंच प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतल्या दुबार नोंदी काढण्याचे आदेशही सरकारनं दिले आहेत. गैरशेती वापरासाठी युरियाचा गैरवापर रोखण्याचे आदेशही सरकारनं दिले आहेत. शासकीय जाहिरातींसाठी अनावश्यक खर्च टाळावा तसंच डिजिटल फ्लेक्ससाठी जनरेटर वापरु नये असंही सरकारनं म्हटलं आहे. सर्व प्रशासकीय विभागांनी ६ महिन्यांसाठी सल्लागारांची नियुक्ती करु नये अशे निर्देशही या परिपत्रकात नमूद आहेत.

---------------------------------------

एचएसआरपी

येत्या ३० जूनपर्यंत वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक - एच एस आर पी बसवणं अनिवार्य करण्यात आलं आहे. राज्यात यासंदर्भातल्या कामाचा आढावा घेतल्यानंतर वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी आता ही मुदत वाढवण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट्स आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी हे क्रमांक बसवणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले. वाहनधारकांनी केवळ अधिकृत संकेतस्थळावरूनच HSRP साठी नोंदणी करावी आणि कोणत्याही अनधिकृत व्यक्ती अथवा एजंटच्या आमिषाला बळी पडू नये, असं आवाहनही परिवहन मंत्र्यांनी केलं आहे.

---------------------------------------

सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत

भारत सरकारच्या पंचायत राज मंत्रालयातर्फे राबविण्यात आलेल्या विविध संकल्पना आधारित उपक्रमांमध्ये देशातील अनेक ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदविला होता,

त्यात भंडारा जिल्ह्यातील ग्रामपंचायत इटगावला राष्ट्रीय स्तरावरचा 'बालस्नेही पंचायत' या संकल्पना प्रकारात प्रथम पुरस्कार प्राप्त झाला असून क्लायमेट एक्शन या संकल्पना प्रकारात भंडारा जिल्ह्यातील खैरी वालमाझारी या ग्रामपंचायतीला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. एक कोटी रुपये आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

-------------------------------------

संभाजी महाराज जयंती

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना राज्यभरातून अभिवादन करण्यात येत आहे. नागपूर महावितरणच्या 'विद्युत भवन' मुख्य कार्यालयात देखील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. नागपूर मनपामध्ये देखील अभिनव कार्यक्रम पार पडला.

-------------------------------------

सौर ऊर्जा प्रकल्प

केंद्र शासनाच्या "प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना" अंतर्गत अमरावती परिमंडळात आतापर्यंत ४८ हजार ७४१ घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले असून, अनेक ग्राहकांचे वीज बिल शून्यापर्यंत आले आहे. या योजनेत दोन किलोवॅटपर्यंत ६० हजार तर तीन किलोवॅटसाठी एकूण ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जात आहे. अमरावती जिल्ह्यात ३३ हजार ८४६ तर यवतमाळ जिल्ह्यात १४ हजार ८९५ ग्राहकांनी सौर प्रकल्प बसविले आहेत.

-------------------------------------

वीज कर्मचाऱ्यांचे आंदोलन

बोनस, पेन्शन आणि खाजगीकरणाच्या विरोधात महाराष्ट्रातील तिन्ही वीज कंपन्यांतील सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांनी सरकारविरोधात आंदोलन पुकारलं आहे. नागपूरसह राज्यभरात आज कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निदर्शने केली. गेल्या २० वर्षांपासून मिळणारा दिवाळी बोनस आणि सानुग्रह अनुदान यंदा अद्यापही देण्यात आले नसल्याचा आरोप नागपूरच्या 'महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंता व अधिकारी कृती समिती'च्या वतीने करण्यात आला आहे.

-------------------------------------

आपत्ती

उत्तर प्रदेशात वादळी पावसामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये गेल्या २४ तासांत ८९ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ५३पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे राज्यभरात धुळीचं वादळ आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. धुळीचं वादळ आणि गारपिटीमुळे भिंत कोसळणं, झाडं किंवा विद्युत खांब अंगावर पडून लोक मृत्युमुखी पडले.

---------------------------------------

सूचना

महाराष्ट्र शासनाने कामगार संहिता नियमाच्या प्रस्तावित प्रारुपावर हरकती आणि सूचना पाठविण्याच आवाहन केल आहे. कामगार आयुक्त कार्यालयाच्या महाकामगार gov.in या संकेतस्थळावर हे प्रारूप उपलब्ध आहे.

---------------------------------------

हवामान

पश्चिम विदर्भाच्या अकोला, अमरावती आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये आज उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, पूर्व विदर्भातील वर्धा जिल्ह्यात देखील आज उष्णतेची लाट राहणार आहे. आज दुपारी अडीच वाजता नोंदवलेल्या तापमानानुसार अकोला जिल्ह्यात सर्वाधिक 45 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली तर अमरावती जिल्ह्यात 44. 6 तर वर्धा जिल्ह्यात 44 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. नागपुरात आज 43 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. अमरावती, अकोला आणि वर्धा जिल्ह्यात उद्या आणि परवा देखील उष्णतेचा यलो अलर्ट कायम राहणार आहे. बुलढाणा, ब्रह्मपूरी, चंद्रपूर, गडचिरोली या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 40 ते 42 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. दरम्यान आज नागपूर सह भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली मध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

---------------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात लढत होणार आहे. हा सामना हिमाचल प्रदेशातल्या धरमशाला इथं संध्याकाळी साडेसात वाजता होणार आहे.

---------------------------------------

दूध दरवाढ

अमूल आणि मदर डेअरी यांनी दुधाच्या दरात प्रति लिटर दोन रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. दुधाचे नवे दर आजपासून लागू झाले. कंपन्यांकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, दरवाढीतून मिळणाऱ्या अतिरिक्त रकमेचा मोठा हिस्सा थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवला जाणार आहे.

--------------------------------------